पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ३६ /२०२३ दि. ९ /०३/२०२३

## —: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—

**ज्याअर्थी,** उल्हासनगर शहर तसेच उल्हासनगर व विठ्ठलवाडी वाहतूक उप विभाग अंतर्गत दि. १०/०३/२०२३ रोजी एकूण ०४ मुख्य शिवजयंती मिरवणुका तसेच १२ उप मिरवणुका काढण्यात येणार आहेत. मुख्य मिरवणुकांची सांगता शिवाजी चौक, उल्हासनगर येथे एकत्र येवून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास पुष्पहार घालून होते. सदर परिसरात शिवजयंती निमित्त मिरवणुकांमुळे शिवसैनिकांची मोठया प्रमाणात गर्दी होणार आहे. सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **सुभाष बुरसे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०२, ठाणे शहर, अतिरिक्त कार्यभार, पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून ,मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१)(अ)(ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून आम जनतेच्या सोयीसाठी खालीलप्रमाणे वाहतुक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे. :—

**प्रवेश बंद –** १) बिर्ला गेट – भारत चौक – शिरु चौक – नेहरु चौक – लिंक रोड – न्यु ईरा चौक – शिवाजी चौक – पवई चौक – हिरा घाट – शास्त्री चौक या मिरवणूक मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना शिजयंती मिरवणुक शिवाजी चौकात जाईपर्यत दि. १०/०३/२०२३ रोजी सकाळी ११.०० ते रात्री २३.०० वाजेपावेतो **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** **अ) बिर्ला गेट :–** बिर्ला गेट मार्गे उल्हासनगर नं. १ व इतर ठिकाणी जाणारी वाहतूक शहाड जकात नाका – महात्मा फुले मार्केट – २४ स्कुल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग –** **ब) भारत चौक :–** भारत चौक मार्गे – गोल मैदान – नेहरु चौक कडे जाणारी वाहतूक मच्छी मार्केट मार्गे तसेच बाबा बेफिक्री चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग –** **क) नेहरु चौक :–** नेहरु चौक मार्गे शिरु चौक तसेच खेमाणी कडे जाणारी वाहतूक मच्छि मार्केट व भारत चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग –** **ड) शिवाजी चौक :–** अंबरनाथ शहर कडून कल्याण कडे जाणारी वाहतुक फॉलवर लाईन येथून जवाहर हॉटेल – नेहरु चौक – गोल मैदान – मधुबन चौक – गुरुद्वारा चौक – शांतीनगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग –** **इ)** कल्याण अंबरनाथ रोडने अंबरनाथ दिशेने जाणारी सर्व प्रकारची वाहने होंडा शोरुम येथून डावे वळण घेवून डॉल्फीन क्लब – गुरुद्वारा चौक – मधुबन चौक – नेहरु चौक – जवाहर हॉटेल – फॉलवर लाईन मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना दि. १०/०३/२०२३ रोजी सायंकाळी १८.०० ते २२.०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहीका तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( सुभाष बुरसे )**
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०२, ठाणे शहर,
अतिरिक्त कार्यभार,
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.

२/– सदरची अधिसचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CamScanner

**<u>प्रत माहितीसाठी सविनय सादर,</u>**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

मा. जिल्हाधिकारी, ठाणे.

मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका.

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :—**

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी

पोलीस उपायुक्त, परिमंडळ—४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

**<u>प्रत</u>** :— <u>पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर</u>

२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**<u>प्रत</u>** :— <u>समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे</u>

२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**<u>प्रत</u>** :— <u>सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग/प्रभारी अधिकारी, उल्हासनगर, विठठलवाडी, अंबरनाथ वाहतूक शाखा.</u>